दै. देशोन्नती दि. ०९/०७/२०२३

# मोक्का व दरोडा गुन्ह्यातील फरार आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ मोक्का व दरोडा प्रकरणातील बळीरामपूर येथील आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ८ जुलै रोजी नमुद त्याचे नातेवाईकांकडे लोहा तालुक्यातील मौजे येळी येथून ताब्यात घेतले आहे.

पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण पोलिसात गुरनं. १२२/ २०२३ कलम ३०२, ३८६,१२० (ब), १४३, १४७, १४८, १४९, ३२३ भादवि. सहकलम ३/२५, ४/२५, २७ माहका. सहकलम १३५ म. पो. का. सहकलम ३ (१), ३ (२), ३ (४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम १९९९ या गुन्ह्यातील फरार असलेला आरोपी अवधुत ऊर्फ लहु दासरवार (२५) वर्ष रा. अशोक बुध्दविहार जवळ, बळीरामपुर याचा शोध घेवुन अटक करण्याबाबत पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थागुशाचे पोनि द्वारकादास यांना आदेशीत केले होते. त्यानुसार आरोपीचा शोध घेणे चालु केले होते. नांदेड यांनी वेगवेगळी पथके तयार करण्यात आली होती. दरम्यान ८ जुलै रोजी स्थागूशाचे पथकास नमुद आरोपी हा त्याचे नातेवाईकांकडे येळी ता. लोहा या गावात असल्याबाबत माहीती मिळाली,या माहितीवरून पथकाने सापळा रचुन फरार आरोपी अवधुत ऊर्फ लहु दासरवार त्यास ताब्यात घेवुन त्यास गुन्ह्याचे तपासकामी नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तसेच पो स्टे नांदेड ग्रामीण गुरनं. ४८३/२०२३ कलम ३९५,४२७ भादवि सहकलम ४/२७ भा. ह.का. गुन्हयातील फरार असलेला एक विधीसंघर्षीत बालकास त्याचे नातेवाईकास नांदेड ग्रामीण येथे हजर ठेवण्याबाबत माहीती दिली आहे. नमुद आरोपीताकडुन आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.या कारवाई पथकात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि व्दारकादास चिखलीकर, सपोनि पांडुरंग माने, पोउपनि जसवंतसिंघ शाहु, पोहेकॉ गंगाधर कदम, विठ्ठल शेळके, रणधीर राजबन्सी, मोतीराम पवार, मारोती मोरे, तानाजी येळगे, चालक गंगाधर घुगे, हेमंत बिचकेवार यांचा समावेश होता.